RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२७ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान मोदींपासून अडचण काय? राहुल गांधी म्हणाले, अशा व्यक्तीमुळे काही ना काही...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७जम्मू काश्मीर**

गेल्या आठवड्यात विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे माजी खासदार राहुल गांधी हे जम्मू काश्मीर दौऱ्यावर होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिथल्या लोकांची राहुल गांधी हे भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा करत आहेत. अशातच श्रीनगरमध्ये काश्मिरी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राहुल गांधी यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदींविषयी नेमकं काय वाटतं याबाबत राहुल गांधी यांनी सांगितले आहे. राहुल गांधी यांनी केलेल्या या विधानाची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरु झालीय.

गेल्या आठवड्यात काँग्रेसचे खासदार जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर असताना राहुल गांधी यांनी या विद्यार्थिनींसमोर विविध प्रश्नांवर आपली मते मांडली. या मुलाखतीचा व्हिडीओ राहुल गांधी यांनी त्यांच्या युट्यूब चॅनेलवर पोस्ट केला आहे. या मुलाखतीमध्ये राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी नेमकी अडचण काय आहे याबाबत भाष्य केलं. तसेच राहुल गांधी यांनी त्यांच्या लग्नाविषयीसुद्धा प्रतिक्रिया दिली.



काश्मिरी विद्यार्थिनींनी राहुल गांधी यांना तुमचा लग्नाचा काय विचार आहे असं विचारलं. मी लग्नाची योजना आखत नाही, पण तसे झाले तर ते (चांगले) आहे. २०-३० वर्षांपूर्वीच लग्नाच्या दबावातून मी बाहेर आलो आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं. राहुल गांधी यांनी त्या मुलींना आपल्या लग्नात बोलावणार असल्याचेही सांगितले.

यावेळी राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींबाबत असलेल्या दोन अडचणींबाबतही सांगितले. मला काश्मीरमधील माध्यम स्वातंत्र्याची मोठी अडचण दिसते आहे आणि देशभरात हेच चित्र आहे.पंतप्रधानांबाबत माझं मत आहे किंवा माझी त्यांच्याबाबत अडचण ही आहे की ते कुणाचंच ऐकत नाहीत. सुरुवातीपासूनच आपण बरोबर असल्याचे गृहीत धरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची मला समस्या आहे. त्यांना जरी सारंकाही दिसत असलं, कुणी त्यांना सांगत असलं की ते जे बोलत आहेत ते चुकीचं आहे तरी ते ही बाब मान्य करणार नाहीत. त्यामुळे या प्रकारची व्यक्ती नेहमीच काही ना काही समस्या निर्माण करते. हे असुरक्षिततेतून येते, ते सामर्थ्याने येत नाही. ते दुर्बलतेतून येते, असं राहुल गांधी म्हणाले.यावेळी राहुल गांधी यांनी जम्मू आणि काश्मीरमधील आगामी विधानसभा निवडणुकांबद्दलही भाष्य केलं. भारतीय इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या राज्याचा पूर्ण राज्याचा दर्जा काढून घेतला गेला आहे. आम्हाला हे काम आवडले नाही. पण, आता आमच्यासाठी राज्याचा दर्जा परत मिळवणे हे तत्त्व आहे आणि त्यात जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या लोकांचे प्रतिनिधित्व समाविष्ट आहे. दिल्लीतून हे राज्य चालवण्यात अर्थ नाही, असेही राहुल गांधी म्हणाले.

## कितीही रडगाणे गायले तरी विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार : एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

विरोधकांनी कतीही आरोप केले, कितीही रडगाणे गायले तरी सुद्धा विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार असल्याचा दावा मुख्यमंत्री एकणाथ शिंदे यांनी केला. टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला दिघे साहेबांची दहीहंडी मानाची हंडी याठिकाणी शिंदे यांनी हजेरी लावली. त्यावेळी त्यांनी हा दावा केला.



आम्ही लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी आणि आता लाडका गोविंदा आदी सह इतर योजना आणल्या आहेत. मात्र यामुळेच विरोधकांच्या पोटात दुखू लागले आहे. त्यामुळे ते सारखे आरोप करत आहेत, त्यांच्या पाया खालची वाळू घसरली आहे. मात्र त्यांनी कितीही आरोप केले तरी सुद्धा विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार असल्याचा दावा त्यांनी केला. आमचे सरकार आल्यानंतर सर्व सण, उत्सव हे निर्भंध मुक्त केले. गोविंदा आता प्रो गोविंदा केला, त्यांचा विमा काढला. मात्र प्रत्येक गोविंदाने हा खेळ खेळताना काळजी घ्यावी असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. आनंद दिघे यांनी सुरू केलेला हा सण आता महाराष्ट्र मध्ये देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जात असल्याचेही ते म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात जे काही काम केले त्यामुळे भविष्यात पुन्हा एकदा भगवा राज येईल असा विश्वास सिने अभिनेते गोविंदा यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कोणाला वाटलेही नव्हते की ठाण्यातून मुख्यमंत्री होईल. मात्र एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे आता त्यांनी केलेल्या कामाचा आवाज दिल्लीपर्यंत पोहचत आहे.

## शिवरायांचा पुतळा कोसळल्यानंतर खऱ्या मावळ्याने ते फोटो व्हायरल केले नसते : देवेंद्र फडणवीस



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर विरोधकांनी राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती. पंतप्रधान मोदी यांनी अवघ्या आठ महिन्यांपूर्वी नौदल दिनाच्या कार्यक्रमात शिवरायांच्या या पुतळ्याचे लोकार्पण केले होते. त्यामुळे या पुतळ्याच्या निकृष्ट दर्जावरुन महायुती सरकार कोंडीत सापडले होते. राज्य सरकारने हा पुतळा नौदलाने उभारल्याचे स्पष्टीकरण दिला असला तरी महाविकास आघाडीने या मुद्द्यावरुन महायुती सरकारचा अक्षरशः पिच्छा पुरवला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लक्ष्य केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही दुःखदायक घटना आहे. यावर कोणीही राजकारण करु नये. पुतळा उभारताना राजकोट किल्ल्यावरील वाऱ्यांचे आकलन शिल्पकाराला करता आले नसावे. आता आम्ही नौदलाच्या मदतीने त्याचठिकाणी नवा पुतळा उभारू. पण या दुर्घटनेनंतर पुतळ्याचे भग्न अवस्थेतील काही फोटो व्हायरल करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा मावळा हे फोटो व्हायरल करणार नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केली. अफझलखानासारख्या कितीही प्रवृत्ती चालून आल्या तरी आम्ही लोकशाही पद्धतीने त्यांचा कोथळा बाहेर काढू, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला राज्य सरकारचं बळ, आणखी एक जीआर काढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई १३**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारनं सुरु केली आहे. राज्य सरकारकडून या योजनेद्वारे महाराष्ट्रातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. या योजनेनुसार आता पर्यंत महाराष्ट्र सरकारनं जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये दिले आहेत. ऑगस्टमध्ये ज्या महिलांनी अर्ज भरले आहेत. त्यांना ३१ ऑगस्टला योजनेचे पैसे दिले जाणार आहेत. यासंदर्भातील कार्यक्रम नागपूरमध्ये पार पडणार आहे.




या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुधारणा करण्यासह व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेतील महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी राखीव असलेल्या ३ टक्के निधीपैकी १ टक्के निधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय फक्त आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी लागू असेल.

**शासन निर्णयात काय म्हटलंय?**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेची व्यापक प्रचार व प्रसिध्दी, प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी/तपासणी करणे, तांत्रिक अडचणींचे निराकरण करणे इत्यादींसाठी लागणाऱ्या तालुका/वॉर्ड/जिल्हा स्तरावरील अतिरिक्त मनुष्यबळाचा खर्च तसेच इतर प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचा ३१ जानेवारी २०२२ च्या २०२०/प्र,क्र,१३१/ कार्या-२ या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बालविकास विभागास महिला व बाल सशक्तीकरण या योजनेसाठी राखीव असलेल्या ३ टक्के निधीपैकी १ टक्का निधी विशेष बाब म्हणून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संबंधित जिल्ह्यात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उर्वरित २ टक्के निधी संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च करण्यात यावा. सदर मान्यता केवळ सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीच राहील.

## पंतप्रधान मोदी जिथं हात लावतात तिथं माती होते; संजय राऊतांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ मुंबई**

सिंधुदुर्ग इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा महायुती सरकारनं ८ महिन्यापूर्वी बसवला होता. पण हा पुतळा सोमवारी कोसळला. यावर विरोधकांनी टीका केली असून, शिवप्रेमीमधून संतापाची लाट उसळत आहे. हे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानं ओळखलं जातं... चालवलं जातं... परंतु ज्या पद्धतीनं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची हानी झाली, ते पाहून आमच्या हृदयावरती घाव पडलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुका आणि मतं डोळ्यासमोर ठेवून घाईघाईनं महाराजांच्या पुतळ्याचं थाटामाटात उद्घाटन केलं. त्यावेळी सरकारला पुतळ्याचं अनावरण करू नका, असं सांगण्यात आलं. पण त्यांनी घाईघाईनं उद्घाटन केलं. त्यावेळी पुतळ्याच्या अनावरासाठी काही इतिहासकारांनी आक्षेप नोंदवला. स्वतः संभाजीराजे यांनीही पुतळ्याच्या अनावरणाला विरोध केला. शेवटी तो पुतळा पडला, हा आघात भरून न येण्यासारख्या आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जिथं हात लावतात, तिथं माती होते, असा जोरदार हल्लाबोल खासदार संजय राऊत यांनी केला.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जिथं हात लावतील तिथं माती होते. एक म्हण आहे हात लावील तिथं सोनं. परंतु पंतप्रधान मोदींच्या बाबतीत असं नाही. पंतप्रधान मोदी जिथं हात लावतील तिथं चांगलं काही होत नाही. त्यांनी अयोध्या मंदिरांचं लोकार्पण केलं. तिथं गाभाऱ्यात पाण्याची गळती सुरू आहे. संसद भवनाचीही तीच अवस्था आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केलं. काल तो पुतळा कोसळला. त्यामुळे देशातील असे पहिले पंतप्रधान आहेत की, जिथं जिथं त्यांनी हात लावला, त्याची माती झाली आहे, अशी खोचक टीका संजय राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली.

## कोलकाता बलात्कार अन् खून प्रकरणात नवा ट्विस्ट; आरोपीने वापरलेली गाडी पोलीस आयुक्ताच्या नावावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७कोलकाता**

कोलकाता येथे काही दिवसांपूर्वी महिला डॉक्टरवर बलात्कार करत तीचा खून केल्याची घटना घडली. त्यानंतर देशभरात या घटनेचे पडसाद उमटले. आजही त्या घटनेचे पडसाद उमटत आहेत. अशातच आता येथून एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. या घटनेतील बलात्कारी आरोपीनं वापरलेली मोटारसायकल कोलकाता पोलीस आयुक्तांच्या नावावर असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. या माहितीमुळे या प्रकरणाला नव वळण मिळण्याची शक्यता आहे.

आरजी कार रुग्णालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या करणाऱ्या आरोपीने वापरलेल्या मोटारसायकलबद्दल धक्कादायक खुलासा समोर आला आहे. महिला डॉक्टरच्या हत्येनंतर आरोपी संजय रॉय ज्या मोटारसायकलवर शहरभर फिरला ती मोटारसायकल कोलकाता पोलीस आयुक्तांच्या नावावर असल्याची धक्कादायक माहिती



समोर आली आहे. याबाबत आता वेगवेळी चर्चा सुरू झाली आहे. तसंच, अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.

**पोलिसांनी ताब्यात घेतली**

कोलकात्याच्या आरजी कार हॉस्पिटलमध्ये बलात्कार आणि हत्या करण्यापूर्वी संजय रॉय रेड लाईट एरियात गेला होता. ८-९ ऑगस्टच्या रात्री ही मोटारसायकल संजय रॉयने वापरली. तीच मोटारसायकल कोलकाता पोलीस आयुक्तांच्या नावाने नोंदणीकृत आहे. या मोटारसायकलीवरून तो रेड लाईट एरियात गेल्याचेही स्पष्ट झालं आहे. दारूच्या नशेत त्याने १५ किलोमीटर मोटारसायकल चालवली, यावरून पोलिसांची मोठी चूक दिसून येते. मिळालेल्या माहितीनुसार, या बाईकची नोंदणी २०१४ मध्ये झाली होती. या खुलाशानंतर सीबीआयने ती ताब्यात घेतली आहे.

## गोंधळानंतर भाजपची तिसरी यादी जाहीर; नव्या यादीत कुणाला मिळाले तिकीट?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ नवी दिल्ली**

जम्मू कश्मीरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून २९ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली. भाजपने तिसरी यादी प्रसिद्ध केली असून, यात दुसर्या टप्प्यातील निवडणूक होत असलेल्या मतदारसंघातील १० उमेदवार, तर १९ उमेदवार तिसऱ्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदारसंघातील आहेत.जम्मू कश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ४४ उमेदवारांची यादी सोमवारी (२६ ऑगस्ट) प्रसिद्ध केली होती. पण, काही वेळातच ही यादी मागे घेण्यात आली. त्यानंतर भाजपची वरिष्ठ पातळीवर दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर पहिली यादी जाहीर करण्यात आली होती. त्यात १५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या यादीत एका उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आले होते.

जम्मू कश्मीरमध्ये ९० जागांसाठी निवडणूक होत आहे. १८ डिसेंबर, २५ डिसेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. संवेदनशील भाग असल्याने तीन टप्प्यात निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.

संपादकीय ......

# बाबांनो, जरा जपून!

जगामध्ये लोकसंख्या वाढण्याचा दर कमी असून, त्यामुळे काही देशांमध्ये मनुष्यबळाची टंचाई जाणवत आहे. मनुष्यबळ असल्याशिवाय विदेशातील बरीचशी कामे होऊ शकत नाहीत. सगळी काही कामे यंत्रांद्वारे होऊ शकत नाहीत, त्यामुळे त्याला पर्याय नसतो. जर्मनीमध्ये अवजड ट्रक चालवण्यासाठी चालकांची कमतरता भासल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र सरकारकडे संपर्क केला आणि २ हजार ट्रकचालकांची मागणी नोंदविली आहे. आपल्या देशात काही असेल-नसेल; परंतु मनुष्यबळ मात्र भरपूर आहे. कारण, लोकसंख्यावाढीचा वेग इतका मोठा आहे की, देश जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश होऊन बसला आहे. हाताला काम नाही म्हणून बेरोजगारी वाढत आहे, गुन्हेगारी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जर्मनीने आपल्याकडे चालक मागावेत, ही एक संधीच म्हणावी लागेल. त्यात पुन्हा जर्मनीमधील बुटेनबर्ग या राज्याने पुणे आरटीओ यांच्याशी संपर्क साधून त्यांना दोन हजार वाहनचालक पुरवण्याची मागणी नोंदवली आहे.

सर्वच क्षेत्रांमध्ये जगभरामध्ये भौतिक सुखे भरपूर आहेत; परंतु काम करण्यासाठी माणसे नाहीत. अशावेळी अवाढव्य अशा लोकसंख्येचा आपला देश जगभरातील सर्व देशांना माणसे पुरवू शकतो, हे निश्चित. मध्यंतरी स्वीडनच्या लोकांनी भारतामध्ये येऊन ३ हजार शिक्षकांची मागणी केली होती; कारण तिथे शिकवायला शिक्षकच नाहीत. येथील हुशार शिक्षकांना तिथे घेऊन जाऊन त्यांच्याकडून अध्यापनाचे कार्य करून घेण्याचा मानस जगभरातून व्यक्त होत आहे. चांगली संधी दिली तर शिक्षकसुद्धा चांगले कार्य करून दाखवू शकतो आणि चांगली वाहने आणि चांगले रस्ते असतील तर चांगला चालक उत्तम कामगिरी करू शकतो, याविषयी कोणाच्या मनात शंका नसावी.आखाती देशांमध्ये असंख्य भारतीय महिला नर्सेस आणि एकंदरीतच रुग्णांची सेवा करण्याचे काम करत आहेत. अमेरिकेमध्ये अनेक संगणक अभियंते भारतातून नेले जात आहेत. एकंदरीतच भारत हा कौशल्यप्राप्त असणार्या बुद्धिमान लोकांचा देश आहे, हे आता जगाने मान्य केले आहे याचा आपल्याला आनंद वाटला पाहिजे. कुशल कामगार आणि अर्धकुशल कामगार यांची आखाती देशांमध्ये भरपूर गर्दी आहे आणि या देशांमध्ये नोकरीसाठी जाण्याची परंपरा तब्बल ६०-७० वर्षांची आहे. अशा परिस्थितीमध्ये शिक्षक, अवजड वाहनांचे चालक, वैद्यकीय सेवा पुरवठा करणार्या व्यक्ती यांना नवे क्षितिज गवसले आहे, असे म्हणावे लागेल. परदेशामध्ये नोकरी मिळण्यासाठी आता तुम्हाला अभियंता किंवा विशेषकरून सॉफ्टवेअर तंत्रज्ञ असण्याची गरज नाही. तुमच्याकडे चांगल्यापैकी कौशल्य असेल तर तुम्ही जगभरात कुठेही चांगल्यापैकी नोकरी मिळवू शकता, हे आता सिद्ध झाले आहे.

फार शिक्षण न झालेल्या लोकांचे विदेशात नोकरी करण्याचे स्वप्नही या माध्यमातून पूर्ण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परदेशात नोकर्या करा, आमच्या शुभेच्छा आहेत; परंतु तिथे जाऊन आपल्या देशाचा मानसन्मान वाढेल अशीच वर्तणूक ठेवा एवढेच सुचवावे, असे वाटते. ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांनीही कुठले ना कुठले कौशल्य आत्मसात करून परदेशामध्ये नोकरी मिळवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून इथे उपलब्ध असलेल्या कमी जागांवरची स्पर्धा कमी होईल. नवीन आकर्षक नोकरीची हमी इथे नाही तर परदेशात निश्चित तशी तुमची निवड होऊ शकते, याविषयी समाधान व्यक्त करावे, असे वाटते.




## गुडघ्यावर बाम चोपडून कंटाळलात,दुखणं कमीच होत नाही? करा पोटली मसाज, पाहा गुडघेदुखीवर इलाज...




**विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य विषय**

गुडघे दुखणं चालताना गुडघ्यांमध्ये वेदना होणं या खूप कॉमन समस्या आहेत. साधारण वयाच्या पन्नाशी नंतर गुडघेदुखीचा त्रास सुरु होतो. परंतु बदलत्या काळानुसार अलीकडे कमी वयातच किंवा तरुणपणीच गुडघेदुखीच्या अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. कमी वयातच गुडघेदुखी आणि गुडघ्यांच्या इतर समस्या निर्माण होण्यासाठी खरंतर अनेक कारणं आहेत. चुकीचा आहार, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, व्यायामाचा अभाव, बैठी लाइफस्टाइल, लठ्ठपणा यांसारख्या अनेक कारणांमुळे कमी वयातच गुडघेदुखी होऊ शकते. गुडघेदुखीचा परिणाम आपल्या रोजच्या रुटीनवर होतो. काहीवेळा या गुडघेदुखीमुळे चालणं - फिरणं देखील खूप मुश्किल होते. गुडघेदुखीच्या या समस्येकडे वेळीच लक्ष दिले नाही तर खूप मोठी गंभीर समस्या निर्माण होऊ शकते.

**पोटली मसाज करण्यासाठी आवश्यक साहित्य :-**

१. ओवा - १ टेबलस्पून

२. लसूण - १० ते १२ पाकळ्या (बारीक किसलेल्या)

३. आलं - १ टेबलस्पून (बारीक किसलेल)

४. मोहरी तेल - १ कप

**कृती :-**

१. एक कढई घेऊन त्यात ओवा, लसूण, आलं ५ मिनिटे कोरडे भाजून घ्यावे.

२. आता दुसऱ्या भांड्यात मोहरीचे तेल हलकेच कोमट गरम करुन घ्यावे.

३. कढईत कोरडे भाजून घेतलेले सगळे जिन्नस एका कॉटन किंवा मलमलच्या कापडात बांधून त्याची पोटली तयार करावी.

४. आता ही पोटली कोमट गरम असलेल्या मोहरीच्या तेलात बुडवून घ्यावी.

५. मोहरीच्या तेलात बुडवून घेतलेली पोटली गुडघ्यांवर ठेवून मसाज करुन घ्यावा.

**गुडघेदुखीवर पोटली मसाज करण्याचे फायदे...**

१. मोहरीच्या तेलात ओमेगा ३ फॅटी सिड, अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. यामुळे सांध्यातील जडपणा आणि सूज कमी होते.

२. लसणामध्ये लिसिनसारखे अँटी-ऑक्सिडेंट आणि सल्फर असते. हे वेदना कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते.

३. गुडघ्यांमध्ये रक्त प्रवाह सुधारून सांधेदुखीपासून आराम मिळतो .

४. ओव्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म देखील असतात. हे सांधेदुखी आणि कडकपणा दूर करते.

५. ओवा, लसूण आणि मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने गुडघेदुखीपासून आराम मिळतो.


६. आले सूज कमी करते आणि गुडघ्यातील रक्त प्रवाह सुधारते.

# उद्धव ठाकरे मुस्लिम समाजाच्या पाठीशी वक्फ दुरुस्ती विधेयकालाही विरोध करणार

वक्फ मालमत्तेला कोणी हात लावू शकत नाही, असे शिवसेना नेते (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उद्धव ठाकरे म्हणाले. उध्दव ठाकरे या महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांनी आपला पक्ष वक्फ दुरुस्ती विधेयकाला विरोध करणार असल्याचे संकेत दिले आहेत. या विधानामुळे त्यांच्या मुस्लिम समर्थकांमध्ये आशा निर्माण झाली आहे की शिवसेना त्यांच्या हितासाठी लढेल. जेव्हा विधेयक संसदेत मतदानासाठी ठेवले जाते, तेव्हा उबाठा खासदार त्याच्या विरोधात मतदान करू शकतात अशी आशा आहे. जरी उद्धव यांना यापूर्वी मुस्लिम समुदायाच्या प्रतिक्रियेचा सामना करावा लागला होता, कारण लोकसभेत विधेयक पहिल्यांदा मांडले गेले तेव्हा शिवसेनेचे (यूबीटी) खासदार अनुपस्थित होते.

नाशिकचे सामाजिक कार्यकर्ते अहमद काझी म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत उद्धव यांना मुस्लिमांनी मनापासून पाठिंबा दिला कारण ते महाविकास आघाडीचा (एमव्हीए) सर्वात अनुकूल चेहरा म्हणून उदयास आले होते. त्यांच्या पाठिंब्यामुळे ऊबाठा सेनेला समाजाच्या समस्यांशी अधिक सुसूत्रता येईल, असा विश्वास होता. वक्फ विधेयकासारख्या संवेदनशील मुद्द्याला विरोध करण्यात सेनेच्या (उबाठा) खासदारांची उणीव हा समाजाच्या पक्षावरील नवा विश्वासाचा म्हणून पाहिला जात आहे.शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आता वक्फ मालमत्तेच्या रक्षणासाठी पाठिंबा देण्याचे वचन देऊन आणि वक्फ कायद्यातील दुरूस्सीच्या विरोधात स्मृत:ला धर्मयुद्ध म्हणून स्थान देण्याचे वचन दिले आहे.

रेल्वे आणि संरक्षण विभागानंतर वक्फ बोर्ड हे देशातील तिसरे मोठे जमीनधारक आहे. वक्फ बोर्डाकडे ८.७ लाखांपेक्षा जास्त मालमत्ता आहेत, ज्यांची किंमत १.२ लाख कोटी रुपये आहे. सरकारने वक्फ कायदा, १९५५ मध्ये सुधारणा करण्यासाठी एक विधेयक सादर केले आहे, जे नंतर संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. केंद्र सरकारने स्थापन केलेल्या या समितीत शिवसेनेचे (उबाठा) खासदार अरविंद सावंत आहेत. अलीकडे, जेपीसीने या



विधेयकासंदर्भात पहिली बैठक घेतली आणि विरोधी पक्षाच्या खासदारांनी या विधेयकाबाबत सध्याच्या स्वरूपात चिंता व्यक्त केल्याचे वृत्त आहे.

वक्फ बोर्डाच्या बेलगाम अधिकारांवर अंकुश ठेवण्याचे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. एकदा वक्फ मालमत्ता म्हणून घोषित केल्यानंतर, मालकी व्यक्तीकडून वक्फकडे हस्तांतरित केली जाते, याचा अर्थ ती आता अल्लाहची मालमत्ता आहे, ज्यामुळे ती अपरिवर्तनीय बनते. वक्फ न्यायाधिकरण मालकी विवादांची प्रकरणे हाताळते. या प्रणालीतील एक प्रमुख समस्या अशी आहे की वक्फ पक्षकार असलेल्या प्रकरणांमध्ये न्यायाधीश म्हणून काम करते आणि ज्या व्यक्तींची जमीन संपादित केली जाते त्यांनी मालकी सिद्ध केली पाहिजे. कालबाह्य वक्फ व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. या विधेयकाविरोधात प्रश्न उपस्थित करून उबाठाने वक्फ बोर्डाला आपला पाठिंबा दर्शवला आहे.

२०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत उद्धव यांच्या पक्षाला ९ जागा मिळाल्या. निवडणूक निकालांच्या विश्लेषणावरून असे दिसून आले आहे की उबाठा गटाला मुंबईतील मुस्लिमबहुल भागातून भरघोस पाठिंबा मिळणार एके काळी याच मुस्लिम बहुल जनतेने बाळ ठाकरेंच्या शिवसेनेला दूर केले होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याशी युती केल्यानंतर, शिवसेना (उबाठा) त्यांच्या सामाजिक आघाडीला पुन्हा अभियंता करण्यासाठी आणि मुस्लिम आणि इतर अल्पसंख्याक समुदायांचे मुद्दे मांडून त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.

२०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत उद्धव ठाकरे प्रथमच चीता कॅम्पमध्ये एका सभेला संबोधित करण्यासाठी दाखल झाले, जे मोठ्या प्रमाणात मुस्लिम लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टी भागात आहे, तोथे त्यांनी मराठीत नव्हे तर हिंदीत बोलणे पसंत केले. शिवसेना वसेना आणि या वस्तीत राहणारे लोक यांच्यात कसे नाते आहे, हे त्यांनी सांगितले. हे सर्व त्यांची शैली किंवा वडिलांची शैली नकृती. वक्फ दुरुस्ती विधेयकावरही उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान मोदींवर टीका केली आणि भाजपने हे विधेयक इतर पक्षांमधील संघर्ष निर्माण करण्यासाठी आणल्याचा दावा केला.विधेयकाला विरोध करणारे सामाजिक कार्यकर्ते उद्धव यांच्या गटासह संसदेत याला विरोध कावा यासाठी काम करत आहेत. याबाबत वकील आणि सामाजिक कार्यकर्ते झुबेर आझमी म्हणाले, मी संसदीय पॅनेलचे सदस्य अरविंद सावंत यांच्याशी बोललो. त्यांनी मला सांगितले की पक्ष या विधेयकाला विरोध करेल... अरविंद सावंत ज्या दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले आहेत, त्या मतदारसंघात २५ टक्के मुस्लिम मतदार आहेत आणि तेथे सावंत ५०,००० मतांनी विजयी झाले हे विशेष.

# तूर पिकातील किडींच्या नियंत्रणासाठी ह्या आहेत सोप्या तीन पद्धती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

महाराष्ट्र हे भारतातील तूर पिकविणारे प्रमुख राज्य आहे. तूर हे महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे डाळवर्गीय पीक असून या पिकावर उगवणीनंतर ते काढणीपर्यंत जवळपास २०० किडींचा व बऱ्याच रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो.यामुळे या पिकाचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता असते. हे नुकसान टाळण्यासाठी कीड व रोगाचे एकात्मिक पध्दतीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

एकात्मिक कीड व्यवस्थापन म्हणजे वातावरणाशी समन्वय साधून एकमेकांशी पुरक अशा सर्व पध्दतीचा यामध्ये मशागतीय, यांत्रिक, जैविक व रासायनिक पध्दतींचा वापर करून किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या खाली ठेवणे होय.

**१) मशागतीय पध्दती**

घाटे अळीचे कोष नष्ट करण्यासाठी उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी.

शिफारस केलेल्या वाणांची योग्य अंतरावर पेरणी करावी.

ज्यावेळी तुरीची सलग पेरणी केली जाते त्यावेळेस बियाण्यात १ टक्का ज्वारी किंवा बाजरीचे बी मिसळून पेरणी करावी.

तुरीबरोबर ज्वारी, बाजरी, मका अथवा सोयाबीन ही आंतरपिके घ्यावीत.

क्षेत्रीय (झोनल) पेरणी पध्दतीचा अवलंब करावा. (संपूर्ण गावामध्ये एकाचवेळी पेरणी करावी.)

वेळेवर आंतरमशागत करून पीक तण विरहीत ठेवावे.

**२) यांत्रिक पध्दती**

पाने गुंडाळणाऱ्या अळीची प्रादुर्भावग्रस्त पाने गोळा करुन अळीसहीत नष्ट करावीत.




शेताच्या बांधावरील तुरीच्या शेंगा पोखरणाऱ्या अळींची पर्यायी खाद्य तणे उदा. कोळशी, रानभेंडी, पेटारी ही तणे वेळोवेळी काढून नष्ट करावीत.

पुर्ण वाढ झालेल्या अळ्या वेचून त्यांचा नाश करावा.

पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी ५० ते ६० पक्षीथांबे शेतात लावावेत जेणेकरुन त्यावर बसलेले पक्षी शेतातील अळ्या वेचून खातील.

शेंगा पोखरणाऱ्या हिरव्या अळीसाठी पीक कळी अवस्थेत आल्यापासून हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. जेणेकरून किडीची आर्थिक नुकसानीची पातळी कळेल.

तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे आणि पोत्यावर पडलेल्या अळ्या वेळोवेळी गोळा करून नष्ट कराव्यात.

**३) जैविक पध्दती**

पीक कळीअवस्थेत असताना ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना मेटाऱ्हायझियम निसोप्ली हे बुरशीयुक्त कीडनाशक २ ते ३ मिली. व राणीपाल (०.०१ टक्के द्रावण) १ मिलि/लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

शेंगा पोखरणारी हिरवी अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन. पी.व्ही विषाणूची २५० एल.ई. प्रति हेक्टर प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी.

# आमचा कचरा आमची जबाबदारी अभियान - दर्यापूर नगरपरिषदेची संकल्पना २९ शाळांमध्ये राबविली जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर, ३**

दैनंदीन जीवन जगत असताना विविध कार्य, कृतीतून आपणाद्वारे निर्मित अनावश्यक गोष्टी ज्या कचरा म्हणून संबोधिल्या जातात, त्या कचर्याची यशस्वीपणे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. या आरोग्य विषयक मोलाच्या कार्यात सर्वांनी सातत्याने योगदान दिल्यास संपूर्ण स्वच्छ राष्ट्रनिर्मितीचे स्वप्न पूर्ण होऊ शकते, असे आवाहन दर्यापूर नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी नंदु परळकर यांनी केले.

स्थानिक प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे माझा कचरा माझी जबाबदारी या नगर परिषद दर्यापूरद्वारा स्वच्छता अभियान मार्गदर्शन उपक्रमाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नगर परिषद दर्यापूरद्वारे स्वच्छता उपक्रमा अंतर्गत ब्रँड अँबेसिडेर म्हणून नियुक्त स्थानिक गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे यांनी दैनंदीन जीवनात आपल्याद्वारे निर्मित होणारा कचरा यासाठी वर्गीकरण, पुनर्वापर व पुनर्चक्रण याबत सखोल मार्गदर्शन केले. प्रा. भारसाकळे हे याच विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याने व ते या अभियानाचे



ब्रॅडअँबेसिडेर नियुक्त झाल्याने प्रबोधन विद्यालयाने त्यांचा कार्यक्रमा दरम्यान यथोचित सत्कार केला. स्वच्छता संकल्पना राबविणारे कर्तव्यदक्ष अधिकारी दर्यापूर नगरीला लाभल्याबाबत मुख्याधिकारी परळकर यांना संपूर्ण दर्यापूर नगरीच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दत्तात्रय रेवस्कर होते.

त्यांनी अध्यक्षीय भाषणांतून उपक्रम विषयांवर संवेदनाशील भाष्य करून उपक्रमाचा शुभारंभ व समारोप यासाठी प्रबोधन विद्यालयाची निवड केल्याबाबत नगर परिषद दर्यापूर कार्यालयाचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्य नरेंद्र गोंडाणे, शिक्षक अरविंद हाडोळे यांचेही समयोचित मार्गदर्शन झाले. उपस्थित सर्व मान्यवरांना विद्यालयातील विद्यार्थीनींनी राखी बांधून रक्षाबंधन सोहळाही साजरा केला. मुख्याधिकारी परळकर यांनी या अभियानाअंतर्गत नगर परिषद दर्यापूर यांचे वतीने स्थानिक विद्यार्थ्यासाठी वर्गवार संपन्न होणार्या प्रश्नमंजुषा , चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजन व बक्षिसे तसेच सुंदर शाळा प्रतियोगीतेबाबत माहिती दिली. प्रास्ताविक करून संचालन निखिल बुंदेले यांनी तथा आभार नगर परिषद शहर समन्वयक ऐश्वर्या भोगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी नगर परिषद नोडल अधिकारी सुमेद खिराळे, आरोग्य निरीक्षक सुशिल मार्वे, नगर परिषद आरोग्य विभागाच्या कर्मचार्यांनी व प्रबोधन विद्यालयाच्या सहकार्याने पूर्ण केली. हे अभियान एकूण २९ शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणार आहे.

# कोलकत्ता येथील घटनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

## आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी समन्वयाने उपाययोजना राबवा : सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

कोलकत्ता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येप्रकरणी संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेची दखल घेऊन जिल्ह्यात अशा घटनाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आरोग्य कर्मचारी व पोलीस यंत्रणेने आपसी समन्वय ठेऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने कामाच्या ठिकाणी आवश्यक ते उपाययोजना राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे कोलकत्ता येथील घटनेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परिस्थिती व उपाययोजना संदर्भात आढावा बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. पोलीस आयुक्त नवीनचंद्र



रेड्डी, पोलीस अधिक्षक ग्रामिण विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, पोलीस उपायुक्त सागर पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, प्र. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रिती मोरे तसेच विविध विभागाचे कार्यालय प्रमुख, खाजगी व शासकीय वैद्यकीय आस्थापना व संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, कामाच्या ठिकाणी आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांना भेडसावत असलेल्या सुरक्षितता आणि संरक्षणविषयक समस्यांचे संबंधित आस्थापनानी तातडीने दखल घ्यावी. आवश्यकतेनुसार सुरक्षतेच्या दृष्टीने उपाययोजना करावी. सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, त्यांचे नियमित नियंत्रण करणे, सुरक्षा रक्षकाची नियुक्ती, महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह, निवासाची व्यवस्था अशा मुलभूत सुविधा कामाच्या ठिकाणी असल्याची खातरजमा संबंधित आस्थापनानी करावी. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात पोलिस यंत्रणेमार्फत ऑडिट केले जाईल. शासन व प्रशासन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी कटीबद्ध असून त्यांच्यासाठी आवश्यक ते उपाययोजना राबविण्यात येईल. महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनासोबतच शाळा, महाविद्यालय, खाजगी व शासकीय आस्थापनाच्या ठिकाणी महिला सुरक्षेसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, असेही ते यावेळी म्हणाले.


महिलांच्या सुरक्षतेसाठी पोलीस यंत्रणा सदैव तत्पर असून त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी २४ तास उपलब्ध आहे. ११२ हा आपत्कालीन क्रमांक असून संकटात सापडलेल्या महिला वा व्यक्तींना पोलीस विभागामार्फत तातडीने मदत दिल्या जाते. या सुविधेचा महिलांनी लाभ घ्यावा. खाजगी व शासकीय आरोग्य विभागाने पोलीस विभागासोबत आपसी समन्वय ठेवावा. ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी जाताना रात्रीच्या वेळी पोलीस यंत्रणेव्दारे सुरक्षा उपलब्ध करुन दिल्या जाईल. संवेदनशील भागामध्ये रात्रीच्या वेळी पेट्रोलिंगचे प्रमाण जास्त करण्यात येईल. महिलासंदर्भातील प्रकरणे हाताळणीसाठी महिला पथक तयार करण्यात आले असून शाळा व महाविलयास्तरावर समुपदेशन करण्यात येत आहे. कोलकत्ता सारख्या घटना होवू नये यासाठी सर्वांनी जागृत राहून होणाऱ्या अत्याचाराविरोधात पोलीस विभागाकडे तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिस विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंगकडे यंत्रणांचे दुर्लक्ष

## जनजागृती गरजेची : उन्हाळ्यात पाण्याचे स्त्रोत पडतात कोरडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. उन्हाळ्यात अनेक गावातील विहिरी व तलाव कोरडे पडतात. त्यामुळे पावसाचे पडणारे पाणी वाहून जाण्याऐवजी त्याची साठवणूक होणे काळाची गरज आहे. परंतु, शासकीय कार्यालयांनाच रेन वॉटर हार्वेस्टिंगचा विसर पडला आहे. यापूर्वी पडणाऱ्या पावसाची साठवणूक करण्यासाठी सूचना करण्यात आल्या होत्या. परंतु, या सूचनांवर अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.




### नागरिकांनीही घ्यावा पुढाकार

केवळ शासनाकडे बोट न दाखविता नागरिकांनीसुद्धा रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी पुढे येण्याची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या घरावरील पडणारे पाणी अडवून त्याची साठवणूक केल्यास पाणी जमिनीत मुरून भूजलसाठा वाढण्यास मदत होईल. शासनानेही प्रत्येक इमारतीला रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक करण्याची गरज आहे. जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणाच दिसत नसल्यामुळे पडणारे पावसाचे पाणी वाहून जात आहे.

दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. मात्र, पडणारे पाणी साठविण्याची प्रशासकीयस्तरावर कठोर उपाययोजनाच होत नसल्यामुळे शासनाच्या मूळ उद्देशालाच तडे जात आहे. याबाबत राजकीय स्तरावरून तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. नागरिकांनीदेखील वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवणूक केली पाहिजे. शिवाय ज्या शासकीय कार्यालयाच्या इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा नसेल तिथे सदर यंत्रणा तातडीने बसविण्याचे आदेश वरिष्ठ स्तरावरून देण्यात यावे, अशी मागणी होत आहे. पावसाळ्यात लाखो लिटर पाणी वाहून जाते. तर उन्हाळ्यात एक लिटर पाण्यासाठी पैसे मोजावे लागतात. हा प्रकार टाळण्यासाठी नागरिकांना पाण्याचे महत्व कळावे यासाठी जनजागृतीची गरज आहे.

# जिल्हा परिषदेत दाखल झाले २३४९ प्रशिक्षणार्थी कर्मचारी

## सहा महिन्यांकरिता नियुक्ती झेडपीच्या कामकाजात होणार मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

शासनाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' अंतर्गत जिल्हा परिषदेमध्ये विविध पदांवर २३४९ प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत कर्मचारी अनुशेष तात्पुरत्या प्रमाणात या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमुळे भरून निघाला आहे. सहा महिन्यांकरिता ही नियुक्ती राहणार आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण, त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' महाराष्ट्र शासनाने २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे सर्वच विभागात विविध प्रशिक्षणार्थी



कर्मचाऱ्यांकरिता जागा काढण्यात आल्या आहेत. अशातच जिल्हा परिषदेमध्ये देखील अर्ज बोलाविण्यात आले होते. अशातच जिल्हा परिषदेने तब्बल २,३४९ प्रशिक्षार्थीची भरती केली असून त्यांना आदेश देखील देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेत आधीच रिक्त जागांचा मोठा अनुशेष असल्याने या प्रशिक्षणार्थीच्या भरतीमुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजात गती येणार आहे. या प्रशिक्षणार्थीच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना कामकाज देण्यात आले आहे. यामध्ये जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने १७१ कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत. याशिवाय ग्रामपंचायतीस्तरावर ६५०, शिक्षण विभागाकडून ९७५ शिक्षकांचे तर आरोग्य विभागाकडून ५११ व पशुसंवर्धन विभागाने ४२ कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. अशा एकूण २,३४९ कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिन्यांकरिता मानधनावर नियुक्ती दिली आहे. सहा महिन्यांनंतर प्रतीक्षेतील कर्मचाऱ्यांना संधी मिळणार आहे.

# चांदूर बाजार मध्ये ३० ऑगस्टला विश्व हिंदू परिषदच्या वतीने दहीहंडी महोत्सव

## भाजपा नेत्या माधवी लथा यांची प्रमुख उपस्थिती : माजी नगरसेवक टिकू अहिर यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चांदूर बाजार**

चांदूर बाजार मध्ये शुक्रवार ३० ऑगस्ट रोजी विश्व हिंदू परिषद प्रणित बजरंग दलाच्या वतीने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन केले असून या महोत्सवाचे प्रमुख वक्ता तेलंगाणा येथील हिंदू शेरणी भाजपा नेत्या राहणार असून त्यांची विशेष उपस्तिती लाभणार आहे बजरंग दल,श्री हनुमान क्रीडा,संस्कृतिक व व्यायाम मंडळ,धर्मवीर संभाजीराजे आधुनिक व्यायाम शाळा च्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून चांदूर बाजार शहरातील नेताजी चौक परिसरात या दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते यंदा विश्व हिंदु परिषदेच्या स्थापना दिना निमत्य या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून गोविंदा पथकांनी मोठ्या संखेत सहभाग नोंदवावा असे आवाहण माजी नगरसेवक आनंद उर्फ टिकू अहिर यांनी केले आहे डॉ. माधवी लता या



तेलंगणातील विरिंची हॉस्पिटलच्या अध्यक्षा आहेत याशिवाय माधवी लता या हिंदुत्वाचा प्रचार करत आहेत आणि हिंदू शेरनी म्हणून त्यांना ओडखळ्या जात त्यांनी हिंदुत्वावर दिलेली अनेक भाषणे चर्चेत आहेत नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात पहिल्यांदाच उतरलेल्या माधवी लता यांची उमेदवारी अन असूयुद्धीन ओवेसी यांच्या विरोधात वक्तव्ये संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरला होता यासह हैदराबादमध्ये सामाजिक कार्यात त्या अग्रेसर असतात अश्यातच चांदूर बाजार येथे विश्व हिंदु परिषद बजरंगदलाच्या दहीहंडी महोत्सवा मध्ये चांदूर बाजार येथे माधवी लथा यांची विशेष उपस्तिती राहणार असून त्या जनेतेला व गोविंदा पथकांना काय मार्गदर्शन करणार यावर सर्वांचे लक्ष लागले आहे सुरक्षेच्या दृष्टीने चांदूर बाजार पोलीस सुद्धा लक्ष देऊन आहेत आणि पोलिसांनचा चोख बंदोबस्त परिसरात राहणार आहे.

# कावड यात्रेत माजी खासदार सौ.नवनीत राणा यांची विशेष उपस्थिती

## माजी खासदार सौ.नवनीत राणा यांनी वाढविला उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ अमरावती**

श्रावण महिण्याच्या पावन पर्वावर भक्ती आणि शक्तीचे प्रतीक असलेली कावड यात्रा संपूर्ण भारतामध्ये मोठया उत्साहात आणि आनंदात कावड यात्रेकरु काढत असतात. त्या अनुषंगाने अमरावती व अकोला जिल्हयातील आसेगाव पुर्णा,अचलपूर, परतवाडा, पांढरी, अंजनगाव सुर्जी, चिचोली रहिमापुर व



अकोट या ठिकाणच्या कावड यात्रे करुनी कावड यात्रेचे आयोजन केले होते. या कावड यात्रेमध्ये अमरावती लोकसभेच्या कर्तव्यदक्ष माजी खासदार सौ.नवनित राणा यांना विशेष निमंत्रीत करण्यात आले होते.

कावड यात्रेकरुची उत्साह वाढविण्याकरीता सौ.नवनीत राणा यांनी विशेष उपस्थिती दर्शविली होती. या कावड यात्रेमध्ये स्वत: सौ.नवनीत राणा यांनी हर हर महादेव, जय जय भोलेनाथ अशा जोरदार जयघोष करत कावड यात्रेकरुचा मोठा उत्साह वाढविला व भगवान शंकराकडे संपूर्ण अमरावती व अकोला जिल्हयातील शेतकरी, शेतमजुर व सर्व सामान्य तसेच कावड यात्रेकरुचा घरी सुख-समृध्दी नांदो अशी प्रार्थना केली. यावेळी या कावड यात्रेमध्ये हजारोच्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती हे विशेष.

यावेळी अकोटचे आमदार श्री.प्रकाशभाऊ भारसाकडे, गोपाल तिरमारे, अजय देशमुख, उपेन बछले, सुधिर रसे, अभयजी माथने, मंगेश कोकाटे, रविंद्र गवई, अमोल कोरडे याच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# जि.प.अमरावती शिक्षण विभागाच्या वतीने मुख्यमंत्री माजी सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ कार्यशाळा संपन्न

## संजिता मोहपात्रा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती यांची प्रमुख उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

जि.प.अमरावती शिक्षण विभाग अंतर्गत मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ संबंधाने मूल्यमापन प्रकिया कशी राबवावी यासंदर्भातील कार्यशाळेचे अयोजन क्षितिज पॅलेस अमरावती येथे आज मंगळवार दि.२७ ऑगस्टला सकाळी १० ते ५ कालावधी मध्ये आयोजित करण्यात आले होते.

या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मा.संजिता मोहपात्रा मॅडम (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती),मा. संतोषजी जोशी साहेब (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती),मा.शिवलिंगजी पटवे साहेब (शिक्षण उपसंचालक, अमरावती



विभाग अमरावती),मा.मिलिंदजी कुबडे साहेब (प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती),मा.बुद्धभूषणजी सोनोने साहेब (शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प.अमरावती),मा.दिपकजी कोक्तरे साहेब (उपशिक्षणाधिकारी, जि.प.अमरावती), उपस्थित होते.कार्यशाळेचे प्रस्ताविक मा.प्रविनजी खांडेकर साहेब (शिक्षण विस्तार अधिकारी, जि.प.अमरावती) यांनी केले तर कार्यशाळेला सर्व मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले,तसेच मुख्यमंत्री माजी सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ चे मूल्यमापन कसे करावे याबाबतचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन पीपीटी व प्रपत्राच्या माध्यमातून मा. दिपकजी चांदुर सर (अधिव्याख्याता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती) यांनी केले.* *कार्यशाळेला मूल्यमापन प्रक्रियामधील अधिव्यख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गटशिक्षणाधिकारी साहेब,शिक्षण विस्तार अधिकारी साहेब,केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.कार्यशाळेचे संचालन शैलेंद्र स.दहातोंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष राऊत सर यांनी केले.

# नितीन कदम यांचे आ.राणा यांना आव्हान

## स्वागताचे पोस्टर राणांचा सूचनेवरून मनपाने काढल्याचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पटेल यांच्या आगमनानिमित्त नवाथे चौकात पोस्टर्स लावले होते. परंतु, मनपाने नितीन कदम यांचे पोस्टर्स काढल्याने कदम चांगलेच आक्रमक झाले. रवि राणाच्या सांगण्यावरून मनपाने पोस्टर्स काढले. आम्हीआता राणा दाम्पत्यांचे शहरातील सर्व पोस्टर्स काढणार. तसेच नवाथे चौकात राणा दहीहांडी कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असे नितिन कदम यांनी अतिशय आक्रमकतेने सांगितल्याने आता नविन वाद पोलिसांसाठी डोकेदुखी ठरणार असल्याची चिन्हे दिसू लागली आहे. संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितिन कदम यांनी तीन वर्षापूर्वीच आमदार रवि राणांविरोधात बडनेरा मतदार संघातून निवडणूक लढण्याचा संकल्प घेऊन त्या दिशेने जोरदार तयारी देखील केली आहे.

नितिन कदम यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर बडनेरा मतदारसंघात नविन राजकीय समीकरण तयार होण्याची शक्यताआहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे अमरावती शहराच्या दौऱ्यावर येणार आहे. यासाठी नितिन कदम यांनी बडनेरा ते राजकमल पर्यंत पोलवर रोहित पवारांच्या आगमनाचे पोस्टर्स लावले होते. तसेच नवाथे चौकात रोहित पवारांच्या भव्य स्वागताची तयारी देखील कदम यांनी केली होती. परंतु, आज २६ ऑगष्ट रोजी दुपारी मनपाच्या अतिक्रमण विभागाच्या ट्रकने अचानक नितीन कदम यांचे पोस्टर्स काढायला सुरूवात केली. याबाबत माहिती मिळताच कदम हे तातडीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह नवाथे चौकात आले आणि पोस्टर्स काढण्याचे काम थांबविले. तसेच पोस्टर्स काढणाऱ्यांनाच ते पोस्टर्स पुन्हा लावायला सांगितले. हे शहर रवि राणांची जागीर नाही. जेव्हापासून आपण रवि राणा विरोधात निवडणूक लढण्याचे जाहीर केले, तेव्हापासून ते मनपा प्रशासनावर दबाव आणून आपल्याविरोधात अनेक प्रकारची कुरघोडी करित असल्याचा आरोपही कदम यांनी यावेळी केला.

### कुठल्याही परिस्थितीत राणांची दहीहंडी नवाथे चौकात होऊ देणार नाही



रवि राणांच्या दहीहांडीमुळे नवाथे चौक दोन दिवस ठप्प पडतो. दुकानदार, हॉकर्स यांचे नुकसान होते. राजकमल चौक ते बडनेरा मार्गावर अनेक खाजगी रूग्णालय आहेत. रूग्णवाहिकांना नाहक मार्ग बदलावा लागतो. मार्ग बदलल्याने नागरिकांना, शाळकरी मुलांना, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुध्दा त्रास होते. त्यामुळे मनपाने त्यांना दसरा मैदानात किंवा इतर कोणत्याही मैदानात दहीहांडीची परवानगी द्यावी. आम्ही कुठल्याही परिस्थितीत राणाची नवाथे चौकात दहीहांडी होऊ देणार नाही. मनपाने त्यांना परवानगी दिली तर तीव्र आंदोलन करून. आंदोलनाचे जे परिणाम होतील, त्याला मनपा व पोलिस प्रशासन जवाबदार राहिल, असा इशारा नितिन कदम यांनी दिल्याने आता शहरात नवीन वाद पेटणार असल्याची चिन्हे दिसू लागली आहे.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

## हवामान खात्याने व्यक्त केला अंदाज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

राज्यात पावसाचा जोर वाढत असून उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात पावसाने ठाण मांडले आहे. सध्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. आठवड्याच्या अखेरीस शनिवार आणि रविवारी रविवारी कोकण, मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस झाला. दरम्यान, हवामान खात्याने राज्यात २९ ऑगस्टपर्यंत पावसाचा मुक्काम राहील, असा अंदाज दिला आहे.

भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, राजस्थान आणि गुजरातच्या काही भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील दोन ते तीन दिवसात राजस्थान, गुजरात, कोकण आणि गोवा, मध्य महाराष्ट्र आणि पश्चिम मध्य प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, वायव्य झारखंड आणि परिसरावर ठळक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असून, ही प्रणाली मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात राज्याकडे येण्याची शक्यता आहे. उत्तर बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीमुळे नव्याने कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. मान्सूनचा आस राजस्थानच्या जैसलमेरपासून, कोटा, खजुराहो, व कमी दाबाचे केंद्र, रांची ते ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. गुजरातपासून महाराष्ट्राच्या किनाऱ्याला समांतर हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातही जोरदार पाऊस होत आहे. रायगड जिल्ह्यासह पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर दोन दिवस रेड अलर्ट देण्यात आला आहे. उर्वरित तुरळक ठिकाणी विजांसह मध्यम ते जोरदार सरींची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. राज्यात ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला पावसाने विश्रांती घेतली. मात्र, सुरुवातीच्या दोन आठवड्यानंतर पुन्हा पावसाचा जोर वाढला आहे.

# खासदारकी पाठोपाठ आता आमदारकी जाईल : रोहीत पवार

## अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता मेळावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

मागील पाच वर्षापासून अमरावती जिल्ह्याचा विकास झालेला नाही. त्यामुळे यंदा झालेल्या लोकसभा निवडणुकीत तत्कालीन खासदारांना त्यांची जागा जनतेने दाखवून दिली. आता आगामी काळात होणाऱ्या – विधानसभा निवडणुकीत आमदारांनाही त्यांच्या पदाला मुकावे लागेल. त्यामुळे आधी खासदारकी गेली आता आमदार की जाईल, असा – थेट इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते आमदार रोहित पवार – यांनी राणा दांपत्याला दिला. राष्ट्रवादीचा सोमवारी शहरातील – जाधव पॅलेस येथे कार्यकर्ता मेळावा घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेतआ. पवार यांनी महायुतीवर तोफ डागली.रोहित पवार म्हणाले, की भाजपने २०१४ पासून देशात जातीधर्मामध्येद्वेष पसरवण्याचे काम केले आहे. विकासाच्या दृष्टिकोनातून ते फेल ठरले आहे. देशात महिला अत्याचार, बेरोजगारी, महागाई, शेतकरी आत्महत्या,खासगीकरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे काही महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मिळालेला कौल का पाहता भाजपला जनतेने नाकारले आहे. तसेच महाराष्ट्रातही महायुतीला आगामी काळात या प्रकाराला समोरे जावे लागणार आहे. मराठी माणूस त्यांना धडा शिकवेल. तीन महिन्यात महाविकास त आघाडीचे सरकार येईल, असा विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त म केला. लोकसभेचा निकाल बघता भाजप सरकार घाबरलेल्या व स्थितीत आहे. तसेच महायुतीलाही राज्यात भीती असल्यामुळे त्यांनी विधानसभेच्या निवडणुका पुढे ढकलल्या. मात्र, त्यांना निवडणुकाघ्याव्याच लागतील. २६ नोव्हेंबरपर्यंत कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होतील आणि या वेळी महाविकास आघाडीला २३० च्या वर जागा मिळतील, अशी आशाआ. रोहित पवार यांनी व्यक्त केली. या मेळाव्याला पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ४ मतदारसंघाची मागणी,बडनेऱ्याला प्राधान्य

आ. रोहित पवार यांनी सोमवारी रात्री अमरावतीत पत्रकारांसोबत संवाद साधला. आम्हाला जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आठ पैकी चार मतदारसंघ राष्ट्रवादीने लढवावेत, अशी मागणी केली.त्यामुळे या संदर्भात आम्ही पक्षाच्या वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय घेऊ.मात्र बडनेरा मतदारसंघ आमच्या पक्षासाठी सुटावा, यासाठी प्राधान्याने प्रयत्न राहणार, अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.

### रोहित पवार माझे चांगले मित्र

रोहित पवार हे माझे चांगले मित्र आहेत. ते जे काही बोलले असतील, ते मला मित्र म्हणून बोललेआहेत, असे आमदार रवी राणा म्हणाले.

# चंद्रपूर येथील वादग्रस्त शिक्षणाधिकारी निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ चंद्रपूर**

चंद्रपूर: जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे माध्यमिक शिक्षणाधिकारी पदावर कार्यरत कल्पना चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरण, सेवानिवृत्ती उपदान, वैद्यकीय देयके, वरिष्ठ वेतन श्रेणीची प्रकरणे, निवड श्रेणीची प्रकरणे, मृत कर्मचाऱ्यांचे गट विमाचे लाभ, वैयक्तिक मान्यतेची प्रकरणे अशी अनेक प्रकरणे प्रलंबित ठेवणे. कर्मचाऱ्यांकडून आर्थिक देवाणघेवाण केल्याशिवाय प्रकरण निकाली न काढणे, भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे, जिल्ह्यात कार्यरत कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी,संस्था चालक यांना सतत



आर्थिक व मानसिक समस्येला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच तक्रारी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेला संघटनेला सतत प्राप्त होत होत्या.

त्याची दखल घेऊन शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी विधान परिषदेत प्रकरण लावून धरले. तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हा सर्व पदाधिकारी, नागपूर विभागीय पदाधिकारी आणि माजी जिल्हा कार्यवाह रामदास गिरटकर, माजी आमदार नागो गाणार यांनीही प्रकरणाचा पाठपुरावा केला. तब्बल दोन वर्षापासून सतत कर्मचाऱ्यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन श्रीमती कल्पना चव्हाण, शिक्षणाधिकारी यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध लढा उभारत अन्यायग्रस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तक्रारीची सत्यता शोधून,वेळोवेळी पुरावे गोळा करून, शासन–प्रशासनाकडे सतत पुराव्यानिशी पाठपुरावा केला.त्यासाठी वरिष्ठ संबंधित कार्यालयाकडे शासन, प्रशासनाकडे तक्रार व निवेदने देऊन,धरणे, आंदोलने, मोर्चा काढून भ्रष्टाचारा विरूद्ध जनजागृती करून श्रीमती कल्पना चव्हाण यांची विभागीय चौकशी करून निलंबित करावे. अशा प्रकारचे वारंवार शासनाकडे निवेदने दिले. तक्रारीची शासनाने व प्रशासनाने दखल घेऊन, शिक्षण आयुक्त यांनी जानेवारी २९२४ मध्ये शिक्षणाधिकारी श्रीमती कल्पना चव्हाण यांच्यावर दोषारोप पत्र दाखल करून विभागीय चौकशीचे आदेश निर्गमित केले. निलंबन काळात खासगी नोकरी अथवा व्यवसाय केल्यास त्या गैरवर्तणूक बाबत दोषी ठरतील व कारवाईस पात्र ठरून निर्वाह भात्यावरील हक्क गमावून बसतील असेही या आदेशात नमूद केले आहे.

# वाहन चालकांना जर्मनीत नोकरीची संधी- आरटीओचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

राज्यात उपलब्ध असलेल्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपियन युनियन मधील देशांना करता यावा व त्यायोगे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येऊन, त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत व्हावी.

दोन्ही देशांमधील संबंधसुदृढ होतील व अनेक सशक्त सामाजिक आर्थिक बदलांची सुरुवात जागतिक स्तरावर होऊन मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान प्राप्त होईल हा शासनाचा दृष्टिकोन समोर ठेवून परिवहन विभागाने कुशल




मनुष्यबळ अदान प्रदान कार्यक्रमांतर्गत जर्मनीला आपल्या देशातून वाहतूक क्षेत्रातील मनुष्यबळ पुरविण्याच्या कराराप्रमाणे बाडेन वुटेनबर्ग या राज्यास कुशल वाहन चालक पुरविण्यासाठी बस, ट्रक , हलकी आणि जड वाहन चालकांना या पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत जर्मनीस जाण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

इच्छुक वाहनचालकांना शासनामार्फत आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार असून यामध्ये लेफ्ट हॅन्ड ड्राईव्ह तसेच जर्मन भाषा प्रशिक्षण शासनामार्फत देण्यात येणार आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत यासंबंधी मदत कक्ष उघडण्यात आला असून इच्छुक उमेदवारांनी कार्यालयातील मदत कक्षास संपर्क साधावा तसेच उमेदवारांचा सर्व खर्च हा शासन करणार असल्याने जास्तीत जास्त वाहन चालकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार यांनी केले आहे .

# लाभार्थींनी बँक खात्याला आधार सिडींग करुन घ्यावे : मनपा आयुक्त सचिन कलंत्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेकरीता अर्ज केलेल्या सर्व लाभार्थींना जाहिर आवाहन करण्यात येते की, १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत भरलेल्या अर्जात ज्या लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही त्यांनी तसेच १ ऑगस्ट २०२४ पासून आतापर्यंत भरलेल्या अर्ज यामध्ये आपण अर्जात नमूद केलेले बँक खाते हे आधार सिडेड आहे की नाही याची खात्री करुन घ्यावी. बँक खात्याला आधार सिडींग केलेले नसल्यास तात्काळ आपले खाते ज्या बँकेत आहे अशा बँकेत जाऊन आधार सिडींग करुन घ्यावे. ऊइढ द्वारे थेट लाभ हस्तांतरणासाठी सदरची बाब अनिवार्य आहे. जे खाते आधार कार्ड सिडेड



राहणार नाही त्यांच्या खात्यात पैसे जमा होवू शकत नाही.

तुम्हाला तुमच्या नोंदणीकृत सेलफोन नंबरवर किंवा बँकेकडून ईमेल पत्त्यावर तुम्हाला स्थितीची माहिती देणारा एसएमएस प्राप्त होईल. तुमचा आधार तुमच्या बँक खात्याशी लिंक करायचा असेल तर णखऊ–ख वेबसाइटवर तुमच्या विनंतीची स्थिती कशी पडताळायची याविषयी तुम्हाला कोणतीही सूचना मिळण्याची शक्यता नाही. तुमचे खाते आणि आधार लिंक झाले आहेत का हे शोधण्यासाठी तुमच्या बँकेशी संपर्क साधा. तथापि, पूर्वी, तुम्ही तुमचे आधार आणि तुमचे बँक खाते णखऊ–ख वेबसाइटद्वारे लिंक केले आहे का ते तपासू शकता.सदर लाभार्थींनी लवकरात लवकर बँकेत जाऊन आधार सिडींग करुन घ्यावे असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# जावरा,फत्तेपूर व करजगांव या गावाकरिता स्वतंत्र बस फेरी द्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

तिवसा तालुक्यातील जावरा,फत्तेपूर व करजगांव येथील विध्यार्थी शिक्षणासाठी तिवसा येथे एस टी बसने ये–जा करावे लागते.विध्यार्थ्यांची शाळेची वेळ सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असतात.परुंतु एस टी बस ची वेळ सकाळी ९.३० ला आहे त्यामुळे विध्यार्थ्यांना सकाळी ९.३० वाजता पासूनच घरून निघाव लागते. शाळेला सुट्टी सायंकाळी ५.३० वाजता होते परुंतु एस टी ची वेळ सायंकाळी ७ वाजताची असल्यामुळे विध्यार्थ्यांना घरी जायला रात्रीचे ८ वाजतात आणि तेही बस वेळेवर आली नाही तर रात्रीचे ९ सुद्धा वाजतात.एकच एस टी बस वणी येथून ममदापुर नंतर इसापूर नंतर नमस्कारी या गावाला जाते आणि तीच बस नंतर परत तिवसा येथे सायंकाळी ७ वाजता येऊन विध्यार्थ्यांच्या गावाकरिता लागते.तोपर्यंत विद्यार्थी शहरापासून दूर असणाऱ्या बस स्थानकामध्ये वाट पाहत बसलेले असतात.सकाळी ९ वाजता पासून ते रात्रीचे ८ वाजेपर्यंत विद्यार्थी तात्कळत असते.यामुळे विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून अभ्यासाला वेळ मिळत नाही.तसेच आज देशात बदलापूरच्या सारख्या घटना घडत आहे.विद्यार्थिनी बस स्थानकात विना सुरक्षा रात्रीचे ८ वाजेपर्यंत असते.त्यामुळे विध्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे?बस स्थानक शहरापासून दूर आहे आणि बाजूला जंगल आहे.जर वाईट घटना घडेल तोपर्यंत वाट पाहावी का?याला जबाबदार कोण?त्यामुळे विध्यार्थ्यांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विध्यार्थ्यांनी विभागीय कार्यालयाला भेट देऊन निवेदन दिले असता आमच्या गावाला स्वतंत्र्य बस देण्यात यावी जेणेकरून आम्ही वेळेवर घरी पोहचू आणि पर्यायाने आमचे शैक्षणिक नुकसान टळेल व आमची सुरक्षा सुद्धा होईल.